# दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका

(मराठी त्रैमासिक)

## जुलै / ऑगस्ट / सप्टेंबर, २०११

वर्ष : ३० ✲ अंक ३ रा.

संपादक : **चंद्रकुमार नलगे**

मुद्रक : गणेश प्रिंटर्स, कोल्हापूर, फोन : २६९५५४५

मुखपृष्ठ : विजय टिपुगडे

मूल्य : ४० रुपये.

- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृतीमंडळाने या नियतकालिकास अनुदान दिले असले, तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ किंवा राज्य शासन सहमत असेलच असे नाही.
- या अंकाला महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अनुदान प्राप्त.

# अनुक्रमणिका


१) 'ग्रामीण साहित्य चळवळ' चळवळीचा लेखाजोखा मांडणारा ग्रंथ — डॉ. सुभाष आहेर

२) मुस्लीम कवितेतील महापुरुषांच्या विचार व कार्याचे चित्रण : दृष्टिक्षेप — किशोरकुमार काशिनाथ कांबळे

३) ग्रामीण आणि दलित साहित्यातील सीमारेषा — प्रा. नारायण शिवशेट्टे

४) मुस्लीम मराठी गझलकार — वसंत केशव पाटील

५) मराठी कवितेतील आदिवासी स्त्रीजीवन — प्रा. अमर कांबळे

६) वसंत आबाजी डहाके यांची कविता — वैजयंतीमाला जाधव

७) तुकाराम गाथेतील हिंदी पदांमधील रामभक्ती — प्रा. सौ. मालती रवींद्र पाटील.

८) 'परिव्राजक' मधील व्यक्तिरेखा — प्रा. प्रशांत गायकवाड

९) 'जबाला ते मेघा' काव्यसंग्रहामधील स्त्रीप्रतिमा — प्रा. माधव मारुती भोसले

१०) आत्मचरित्रातून अभिव्यक्त झालेली स्वातंत्र्य चळवळ — डॉ. प्रकाश दुकळे

११) प्रामाणिक, उत्कट आविष्कार 'तरीही सोबतीला असतात श्वास' — वामन काळे

१२) स्वातंत्र्य, समता व आजची स्त्री — प्रा. प्रज्ञा नागेश लामतुरे

**कविता :** शिरीष पै, फ. मुं. शिंदे, अनुराधा गुरव, रंजन कंधारकर

**चित्रे :** श्यामकांत जाधव

# वसंत आबाजी डहाके यांची कविता

वैजयंतीमाला जाधव

१९६० नंतरच्या कालखंडात काव्यलेखन करणाऱ्या कवी लेखकांमध्ये वसंत आबाजी डहाके यांचे नाव अतिशय महत्त्वपूर्ण आहे. ६० च्या सुमारास काव्यलेखनाला सुरूवात केलेल्या या कवीचा प्रवास फक्त कवितेच्या दिशेने न चालू राहता अनेक अंगांनी चालू राहिलेला दिसतो.

योगभ्रष्ट (१९७२), शुभवर्तमान (१९८७), शुनःशेप (१९९६), चित्रलिपी (२००४) हे कवितासंग्रह अधोलोक (१९७५), प्रतिबद्ध आणि मर्त्य (१९८१) या कादंबऱ्या, यात्रा-अंतर्यात्रा हा निबंधसंग्रह शिवाय साहित्यः इतिहास आणि संस्कृती हा ग्रंथ, विविध स्वरूपाची साहित्य समीक्षा, शालेय मराठी शब्दकोश, मराठी वाङ्मयकोशासाठी केलेले लिखाण, अनुवाद, नाटक, कथा, एकांकिका अशा अनेक दिशांनी सतत लिहिते राहिलेल्या या कवी-लेखकाच्या 'चित्रलिपी' या काव्यसंग्रहाला साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहीर झाला.

डहाकेंचा 'योगभ्रष्ट' हा काव्यसंग्रह १९७२ साली प्रकाशित झाला. एकूणच दीर्घ अशा स्वरूपाची रचना असलेल्या या संग्रहाचा लेखनकाळ हा साठीचा होता. या कालखंडातील राजकीय आणि सामाजिक परिस्थिती अतिशय संमिश्र अशा स्वरूपाची होती. दुसरे महायुद्ध, स्वातंत्र्यप्राप्ती, आणिबाणीचा काळ, सर्वसामान्य जनतेचा झालेला भ्रमनिरास यामुळे एकप्रकारे निमाण झालेली विषण्णता या कालखंडाला व्यापून राहिलेली होती. त्यामुळे एकप्रकारची मानसिक अस्वस्थताही या काळात निर्माण झाली.ती या कवितांमधून स्पष्टपणे दिसते. या कवितांमध्ये कवी 'मी' चा वेगवेगळ्या अंगांनी शोध घेताना दिसतो. 'मी' च्या अनादी-अनंत रूपाच्या शक्यताही तो काही ठिकाणी व्यक्त करतो. सर्वत्र पसरलेली मुळं, ओस झाल्या दिशा, आणि योगभ्रष्ट या तीनही कवितांचे केंद्र हा 'मी' आहे. या 'मी' चे वेगवेगळ्या अवस्थेतील जगणे त्यांची कोंडलेली मनस्थिती, कधी कधी अंगी आलेला दुबळेपणा, माणूस म्हणून त्याच्या असलेल्या मर्यादा या साऱ्यांचा सूक्ष्म वेध ही कविता घेते.

'योगभ्रष्ट' मधील कवितांचे मराठी काव्यपरंपरेशी ज्याप्रमाणे जोडलेपण आहे. त्याचप्रमाणे पाश्चात्य काव्यपरंपरेशीही आणि विचारप्रणालीशीही त्यांच्या कवितांची नाळ जोडता येते. त्यांच्या कवितांना असलेला अतिवास्तवाचा स्पर्श, असंबद्ध गोष्टीमध्ये



आढळणारी संबद्धता किंवा विसंगतीत आढळणारी संगती ही काफ्का, सार्त्र, काम्यू या तत्वचिंतकांच्या अनुभवविश्वाशी आपली नाळ जोडते. या कवितेमधून नैराश्येचे, तीव्र वैफल्याचे सूरही ऐकू येतात. अवतीभोवती घडणाऱ्या घटनांच्या गदारोळात कवीचे संवेदनशील मन या सगळ्याला प्रतिसाद देते. हे 'योगभ्रष्ट' आणि 'शुभवर्तमान' या संग्रहावर अस्तित्ववादाचे मार्क्सवादाचेही एक संस्करण आढळते.

ही कविता जगण्यातील खंडीत अनुभवविश्वाच्या अतिशय बारकाईने वेध घेते. या त्यांच्या अनुभवविश्वातील प्रतिमाही आशयाला संपन्न करणाऱ्या आहेत. ईश्वर, विदुषक, काळा रंग, शहर यांच्या प्रतिमा वापरून माणसाचे एकाकीपण, त्याचे तुटलेपण, माणसाचे शोषण करणारी व्यवस्था यांचा वेध घेण्याचाही ते प्रयत्न करतात. माणसं जगण्यासाठी जी धडपड करतात, त्या धडपडीत ती कधी शक्तिहीन होतात तर कधी निराश होतात. त्यांच्या भोवतालची समाजव्यवस्था, राजकीय यंत्रणा व्यक्तीला स्वातंत्र्य देण्यात अपुरी पडते याचे प्रतिध्वनी 'योगभ्रष्ट' प्रमाणेच 'शुभवर्तमान' मध्येही उमटतात.

> शहर मला सोबत देत यातनांचं कारंज
> ते घेऊन मी हिंडतो अनवाणी रस्त्यावरून, विद्यापीठातून,
> बसमधून, लोकलमधून, गिरण्यांमधून, बाजारपेठांतून
> आणि नजरांची अमानुष कत्तल
> सर्वत्र चाललेली ('शुभवर्तमान', पृ.९)

'योगभ्रष्ट' नंतरचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणून शुभवर्तमान मधील कवीतांचा विचार करता येतो. 'शुभवर्तमान' मधील कवीत ही अधिक 'अंतर्मुख आणि विचारशील'[१] झाल्याचे कवीचे मत या ठिकाणी विचारात घेण्यासारखे आहे. साधारणतः 'योगभ्रष्ट' नंतरच्या म्हणजे १९७२-७३ नंतरच्या कालखंडातील या कविता आहेत. सभोवतालची सामाजिक आणि राजकीय परिस्थिती या परिस्थितीला अपरिहार्यपणे तोंड देणारा सामान्य माणूस, महानगरातील ताण-तणाव आणि त्याच्याशी झगडताना येणारे वैफल्य याला केंद्र करणारी ही कविता आहे. सहज म्हणून उघडलेल्या साप्ताहिकातील चार-सहा पानं फाडलेली आहेत असं लक्षात येताच, त्याचा शोध घेतल्यावर हाती येणारं वास्तव हे सभोवतालच्या यंत्रणेबाबत प्रश्न निर्माण करते. उदा.

> 'सगळ्याच प्रतींमधील ती चारसहा पानं गायब आहेत
> छपाई तर साऱ्याच पृष्ठांची झाली होती वाटतं

तर म्हणालो, यंत्रालाही पचणार नाही असा काही
मजकूर होता का?' ('शुभवर्तमान', पृ.१२)

अशी नेमकी कोणती व्यवस्था कार्यरत आहे, जिची दहशत या यंत्रणेला घेरून आहे. हा प्रश्न येथे निर्माण होतो ही यंत्रणा ज्या शहरात कार्यरत आहे त्या शहराची जीभच कुणीतरी उघडून काढलेली आहे. आणि येथे चाललेल्या राजकीय नाटकाचा प्रेक्षकवृंद हा मुसक्या बांधलेला आहे. सारी जनता कोऱ्या कायदाप्रमाणे स्तब्धच झालेली आहे, किती भाबडी आहे हे सांगताना निवेदक त्यांच्या जगण्याच्या, राज्यकर्त्यांच्या येथील व्यवस्थेच्या कल्पना सांगायला विसरत नाही. उदा.

'मीठ महाग झाली की स्वस्ताई येते
गांवढळ माणसं मनोराज्यात गर्क आहेत' ('शुभवर्तमान', पृ.१६)

साध्या साध्या गोष्टींमध्ये सामान्यांचे जगणे कसे विखुरलेले असते. हे येथे दिसते. त्यांच्या माथ्यावरील आकांक्षांचे आभाळ हे फक्त दंडुक्यांच्या ढगांनी भरून गेलेले असते. ही माणसे परस्परांशी व समुहाशी आपले संबंध टिकवून ठेवतात, प्रसंगी एकमेकांना कोसळण्यासून सावरतात. तर कधी कधी कोसळण्याच्या शक्यतांनाचा टाळण्याचा प्रयत्न करतात. शुभवर्तमानमध्ये व्यक्ती, समूह यांच्या जगण्याबरोबर स्त्री आणि पुरुषांमधील आत्मीय भावनांचेही प्रकटीकरण तीव्रपणे प्रकटले आहे. रूढ अर्थाने लिहिल्या जाणाऱ्या प्रेम कवितांमध्ये मात्र या कविता बसत नाहीत.स्त्री-पुरुष नात्यातील संयमित भावना येथे व्यक्त होतेच.शिवाय सभोवतालच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक परिस्थितीला एकाचवेळी सामोरे जाताना त्यांच्या नात्यांमध्ये झालेली स्थित्यंतरे,मानसिक पातळीवरचे चढउतार यांनाही कविता अधोरेखित करते. एकाचवेळी या पुरुषाला स्त्रीच्यासोबतीची आस आहे.तिच्यासोबत असणे त्याला महत्वाचे वाटते. पण ही सोबत त्याच्या मानसिक पातळीवरचा एकाकीपणा घालविण्यासाठी अपुरीच पडते की काय असे वाटते.या संदर्भात डहाकेंची एक नोंद येथे महत्त्वाची वाटते. ''भोवतालच्या विराट पसाऱ्यामध्ये एकाकीपणा घालविण्यासाठी सोबत हवी असते.एक दुसऱ्याच्या सोबत असणे म्हणजेच 'असणे' असे त्याला वाटत असते.निरर्थकतेमध्ये अर्थपूर्णता शोधण्याचा तो एक प्रयत्न असतो. पण वास्तवात उलट अनुभव येतो.'सोबत' कवितेतला 'तो' विचारतो एकत्र येण्यातच एकाकी होण्याची बीजं असतील का? यामुळे सोबत ही अर्थपूर्णतेकडे अथवा पूर्णतेकडे नेते अशा निःशंक मनाने मी त्याकडे पाहत नाही. एकात्मता हा मानसिक अनुभव असतो. आणि पृथकता ही वास्तविकता असते म्हणजे भौतिक अर्थाने दोघांची एकत्र उपस्थिती असली तर



तात्त्विक अर्थाने ती मनात एकाकीच असते. आणि दोघांचा प्रवास विनाशाकडेच होतो असे नाही. त्या विनाशातच पुन्हा नवे निर्माण होण्याची शक्यता असते.''[१] आणि ही वस्तुस्थिती स्वीकारणे खूपदा बंधनकारक ठरते. समुद्राचे अचानक काळोख होऊन स्वतःमध्ये पसरणं, उध्वस्तेचा स्वर समुद्रभर भरून राहणं आणि तुझा हात मात्र माझ्यात नसणं ही 'मी' आणि 'तू' च्या मधील मानसिक स्थित्यंतरे कवी अत्यंत तरलपणे रेखाटतो. 'शुभवर्तमान' या संग्रहात 'नारायणरावाचा वध' या ऐतिहासिकघटेशी संबंधीत काही कविता आलेल्या आहेत.सत्तेच्या पटावरील विविध पात्रांशी संबंधित अशा या रचना आहेत.हे नाटकच एक विरंगुळा म्हणून केले जात आहे. यातील पात्रे आणि ऐतिहासिक पात्रे यामध्ये वरवर पाहता अंतर्विरोध दिसतो. पण प्रत्यक्षात त्यांच्या भूमिका या त्यांना साजेशाच आहेत. हात नसलेला राघोबा, तोतरा नारायणराव, मुके व बहिरे गारदी ही पात्रे म्हणजे खरे तर सत्तेसाठी हपापलेल्यांचे प्रतिनिधीच आहेत.शिवाय बुद्धिमंताची विद्वता सत्तेपुढे कशी तोकडी पडते याचे एक रूपकच ही कविता उभे करते. डहाकेंची ही दीर्घ कविता आहे. त्यांच्या रचनेचा कल हा दीर्घत्वाकडे असल्याचे पुन्हा पुन्हा दिसते. 'योगभ्रष्ट' ही सुद्धा एक दीर्घ अशी रचना असून गद्यात्मकतेकडे ती झुकते. या संग्रहातील 'प्रतिवादी नटासाठी पार्श्वसूचना', 'श्रीमंत नारायणराव पेशवे यांचा किंवा कुणाचाही खून' सोबत 'पाठीशी स्मशान घेऊन' अशा अनेक दीर्घरचना आहेत. मुक्तशैलीतील या कविता, नादमयता, लयबद्धतेपेक्षा कथात्म गद्याच्या जवळ जाताना दिसतात.

डहाकेंच्या या संग्रहामध्ये दहशत, समुद्र, लोक, शहर, हात, सूर्य, ईश्वर आणि स्पर्श या प्रतिमा वारंवार येताना दिसतात. माणसं, ईश्वर आणि जग या साऱ्यांप्रती कवीची अविश्वासाची एक तीव्र जाणीव या ठिकाणी व्यक्त होते. इथला सूर्य ओसाड आहे, माणसं दुबळी ओत, शहर उजाड आणि ढासळलेलं आहे. इथलं जग सतत उध्वस्त असं होणारं आणि अनिश्चित आहे.हे सतत या कविता वाचताना जाणवत राहतं. डहाकेंच्या सुरवातीच्या दोन संग्रहानंतर आलेल्या 'शुनःशेप'मध्ये तर ही जाणीव अधिकच स्पष्टपणे प्रकट झालेली दिसते. उदा.

'दंगलग्रस्त शहरातल्या निर्मनुष्य रस्त्यांसारखा मेंदू सुन्नस्तब्ध
कसं हे शतक आपल्या अंगावर कोसळत चाललय
त्याच्या मोडून पडण्याचा करकर आवाज मला ऐकू येतोय'
('शुनःशेप', पृ. ५)

शतकाचं अंगावर कोसळणं हे कितीही भयावह असलं तरी कवी ते अतिशय

शांतपणे कोणताही अकांडतांडव न करता व्यक्त करतो आहे. आणि या शतकाचं, काळाचं कोसळण 'टिपण' म्हणून वाचकासमोर ठेवण्याचं त्याचं कौशल्य नोंद घेण्यासारखं वाटतं. या टिपणाचा विचार करण्यावाचून खरं तर कुणाचीच सुटका नाही. या कोसळणाऱ्या समूहात एखादाच 'नकार' वागणारा असतो. त्याची जीभ काढून घेण्याचाही प्रयत्न ही व्यवस्था करते. पण तो जिभेचा लहानसा तुकडाही 'नाही'च म्हणतो. काळोखाची राजवट 'हा नकार देणारा' डोळे मिटून पाहील की उघडेठेवून हाही आत एक प्रश्नच निर्माण होतो पण कवी या साऱ्यांसाठी एक प्रार्थना करत आहे. ही प्रार्थना उद्याच्या दिवसाची खात्री नसलेल्या बाळासाठी आहेच शिवाय या कोसळत्या शतकात शांत राहता यावं यासाठीही आहे. या वर्तमानाचे भयावह वास्तव चिमटीत पकडत कवी भविष्याचंही सूचन कसे करतो आहे ते 'चित्रलिपी'मधून लक्षात येते.

उदा. ''जी बीज पेराल ती, तशी पिकं निघतात
तिरस्कार, घृणा, हिंसा यांची बीज पेराल तर
रक्तानं रंगलेल्या पिकांची कापणी करावी लागेल
आणि खळ्यात तुडवल्या जातील उद्ध्वस्त वस्त्या
अस्सल अंकुरांना, रोपांना खाऊन टाकणारं
भ्रष्ट विचारांचं ताण माजत चाललं आहे
आणि खुरपणी करताना तण नव्हे तर
धान्याचे कोवळे कोंबच खुडले जात आहेत
म्हणून तर सगळीकडे माजलेलं आहे
फड्या निवडुंगाच रान ('चित्रलिपी', पृ. १८)

याठिकाणी जशास तसे या न्यायानं घृणेच्या पोटी घृणाच जन्माला येईल. हिंसेचं बीज रक्तानं रंगलेलं पीकच देईल. द्वेष, वैर यांच्या पोटी द्वेष, वैरच जन्माला येईल हे वास्तव सांगितले आहे. अभिव्यक्ती आणि वैचारिक अंगाने डहाकेंच्या कवितेमध्ये जी अनेक स्थित्यंतरे झाली त्याचा पुढचा टप्पा म्हणून या संग्रहातील कावक्षजाणिवांचा विचार करता येतो. या संग्रहातील जाणिवा अतिशय सहजतेने एक आकार घेताना दिसतात. मागच्या शतकातल्या वेदनांच पुढच्या शतकांत नेमकं काय होत. एकविसावं शतक आपल्या पोटामध्ये ही वेदना नेमकी कशी घेऊन येतं हे या संग्रहामध्ये प्रभावीपणे मांडले आहे.



उदा. 'शतकामागून शतकं सरतात तरी
उगवलेली नसते नवी पहाट
दर वळणावर होत असतो मनात उगवलेल्या
स्वप्नांचा घात' ('चित्रलिपी', पृ.१३)

डहाकेचा 'योगभ्रष्ट' पासून सुरू झालेला काव्य प्रवाह 'चित्रलिपी'पर्यंत वेगवेगळ्या स्थित्यंतरांमधून जाताना दिसतो. 'योगभ्रष्ट' नंतरच्या पुढच्या टप्प्यात म्हणजेच 'शुभवर्तमान'मध्ये कवी अधिक तीव्रतेने त्याचे जगणे मांडताना दिसतो. प्रेमानुभवाची अभिव्यक्ती करताना 'योगभ्रष्ट' मधील सूर शुभवर्तमानाशी जुळताना दिसतात. तर यापेक्षाही लक्षणीय स्वरूपातील अनुभव 'शुनःशेप' मध्ये येताना दिसतो. पलीकडच्या जगातील 'तू'ला भेटण्याची एक तीव्र आस या कवितांमधून अधिक तीव्रपणे व्यक्त होते. तर 'चित्रलिपी'मध्ये 'तू'चं माझ्या डोळ्यात, कपाळात, अस्तित्वाच्या घरात असणं प्रभावीपणे येते.

कवी सुरुवातीपासून आपल्या काव्यप्रवासात जगण्याच्या प्रत्येक टप्प्यावरील चढउतार मांडत पुढे जाताना दिसतो आणि 'चित्रलिपी' मधील त्याचा हा टप्पा नेमका कशा पद्धतीने येतो हेही या लेखाच्या शेवटी नमूद करणे महत्त्वाचे वाटते. आपण सारेच या अस्वस्थ करणाऱ्या वर्तमानात जगत आहोत हा अवस्थांचा एक भोग आहे. इथल्या सुगीचा काळही काळजाला घरं पाडणारा आहे आणि त्यामुळेच तो अनिश्चित आहे. एकूणच या काळाचे कोसळणे व्यक्त करणारा 'चित्रलिपी' हा महत्त्वाचा दस्तऐवज मानावा लागेल.

मी, आम्ही, तू, शहर आणि सभोवतालचा समुद्र या साऱ्यांना हाताशी घेत चारही कवितासंग्रहांमधून जगण्यातले द्वंद्व कवी सतत अधोरेखित करतो आहे. ''अनेक अंतर्विरोधी वृत्तीप्रवृत्तींनी वेढलेल्या वर्तमानकालीन वास्तवात जगताना होणारी सर्वसामान्य माणसाची घुसमट आणि विश्वाच्या तर्कहीन पसाऱ्यात हिंडताना व्यक्तीला पडणारे प्रश्न हे वसंत आबाजी डहाके यांच्या कवितेच्या मुळाशी असलेले सूत्र आहे''[३] ते सूत्र त्यांच्या योगभ्रष्ट ते चित्रलिपी या प्रवासामध्ये जपले गेले आहे असे वाटते.

मराठी काव्यपरंपरे मध्ये आपल्या काव्यलेखनाने स्वतःचे पृथगात्म स्थान निर्माण केलेल्या डहाके यांची कविता माणसाच्या जगण्याचे, त्यांच्या अस्तित्वाचे अर्थनिर्णयन करते. शिवाय बदलत्या काळाचे, त्याच्या अस्वस्थपणाचे वर्तमान प्रखरपणे मांडते. वेगवेगळ्या काळातील सामाजिक आणि सांस्कृतिक पर्यावरणाचे सूक्ष्मपणे शोध घेणारी

त्यांची ही कविता मराठी काव्यपरंपरेत मौलिकपणे भर घालणारी ठरली आहे.

***

संदर्भ :-

१. डहाके वसंत आबाजी (मुलाखत) घारे दीपक, ललित, कविता विशेषांक, सप्टें. १९८८, संपा. अशोक कोठावळे, पुणे पृ. ९३

२. उनि, पृ. ९०-९१

३. डहाके वसंत आबाजी, 'कवितेविषयी', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, १९९९, पृ. २४४.

यत्तणोस